जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -०४ दिनांक - ३/०१/२०२५**

युनिट-१ गुन्हे शाखा पुणे शहर

## एस.पी.टी. मार्शल कडून ७,५५०/-रु किं.चा ८२० ग्रॅम अंमली पदार्थ (गांजा) जवळ बाळगणारे दोन इसम जाळ्यात

पुणे शहरातील वाढती गुन्हेगारी व नियमीत होणारे स्ट्रीट क्राईम रोखण्यासाठी पुणे पोलीस आयुक्त यांनी काही दिवसांपुर्वीच एस.पी.टी. मार्शल नियुक्ती केली असून सर्व पो.स्टे.चे हद्दीत गुन्हे शाखाचे नियंत्रणाखाली सदरचे पोलीस अंमलदार पुणे शहरातील पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलींग करीत असतात.

३१ डिसेंबर २०२४ व नविन वर्षाचे अनुशंगाने पुणे शहरात अनुचीत प्रकार घडू नये म्हणुन मा.पोलीस आयुक्त श्री अमितेश कुमार, यांचे आदेशाने सर्व पुणे शहरात बंदोबस्त लावण्यात आला होता. दिनांक ३१/१२/२०२४ रोजीचे पेट्रोलींग दरम्याण गुन्हे शाखा, युनिट-१ कडील खडक एस.पी.टी. मार्शल वरील **पोलीस अंमलदार सुजय रिसबुड** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी प्राप्त झाली की काही इसम शुक्रवारपेठे मध्ये गांजा विक्रीसाठी येणार आहेत.

अशी खबर मिळताच त्यांनी सदरची खबर युनिट-१ चे प्रभारी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक,शब्बीर सय्यद यांना कळवीली त्यांनी तात्काळ वरिष्ठांचे आदेशाने त्यांचे सोबतचे बंदोबस्तास असलेले अधिकारी व अंमलदार असे पथक खडक एस.पी.टी.-१ मार्शल यांचे मदतीसाठी पाठवीले मिळालेल्या बातमीच्या अधारे दिनांक ०१/०१/२०२५ रोजीचे चालु सुशिल लॉज समोरील अंतर्गत सार्वजनीक रोडवर शुक्रवारपेठ, पुणे येथून इसम नामे **१) समाधान केदा पवार वय ३३ वर्ष रा.मु.पो.लोहनेर,ता.देवळा, जि.नाशिक, २) संदीप सखाराम खैरनार वय ३८ वर्ष रा अपर डेपो पवननगर गल्ली क्र.८, जगताप डेअरी समोर, पुणे** यांना ताब्यात घेवून त्यांचे कब्जातून कि.रू. ७,५५०/-कि रु.चा ८२० ग्रॅम गांजा ,दोन मोबाईल हॅण्डसेट एक ॲक्टीव्हा गाडी असा एकुण ४७,५५०/- रुपये चा ऐवज जप्त करण्यात आला असून सदरबाबत खडक पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.०२/२०२५, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii) (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना पुढील तपासकामी खडक पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले असून अधिक तपास खडक पो.स्टे.चे अधिकारी पोउपनिरी श्री प्रल्हाद डोंगळे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री निखील पिंगळे , मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-१, श्री.गणेश इंगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शब्बीर सय्यद युनिट ०१, सहा.पो.निरी पी.ए.काळुखे , पोलीस अंमलदार विठ्ठल साळुंके, शुभम देसाई, सुजय रिसबुड, रफीक मुल्ला, महेश कुंदे, शशी गाडे व अजित शिंदे यांनी केली आहे.